# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ४०	दिनांक २७/०२/२०२१

## महाराष्ट्र शासनाने वाहतुकीस व विक्रीस प्रतिबंधीत केलेला एकुण २९,८३,४००/ रु किमंतीचा तंबाखु जन्य गुटखा वालीव पोलीसांकडूण जप्त

दिनांक २६.०२.२०२१ रोजी गुजरात बाजुकडुन आयशर टेम्पो क्र जी.जे.२७ टी ६५२२ या मधुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा तंबाखुजन्य पदार्थाची मुंबईकडे वाहतुक होत असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली वरुन चिंचोटी साधना हॉटेलजवळ सापळा लावला असता गुजरात बाजुकडुन आलेला संशयित टेम्पो क्र जी.जे. २७ टी ६५२२ यास ताब्यात घेवुन झडती घेतली असता प्लास्टीक व बारदानाचे नायलॉन गोणीमध्ये प्रिमीयम शुध्द प्लस, विमल पानमसाला, राजनिवास पान मसाला इत्यादी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखु जन्य गुटखा मिळुन आल्याने गुटखा व टेम्पो असा एकुण २९,८३,५००/रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन, टेम्पो चालक मोहमंद मकसुद इसाक शहा यास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द वालीव पोस्टे गुरनं । २२१/२०२१ भादंवसि कलम १८८,३२८,२७२,२७३ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ मधील कलम २६ (२)(४),२७ (१)सह इतर कायदयांतर्गत गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ- ०३ विरार, श्री अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, वालीव पोलीस ठाणे चे वपोनि/विलास चौगुले यांचे मार्गदर्शनाखाली सफौ गजानन दिघोळे,पोना/१२८५ कुंभार,पोना/९९२ शिंदे व पोशि/१८२७ हेंबाडे यांनी केली आहे.

# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

## रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ४१ दिनांक २७/०२/२०२१

## मालजीपाडा, वसई पुर्व येथे खाडी किनारी बेटावर वालीव पोलीसांनी छापा टाकून गावठी हातभट्टी दारु तयार करण्याची साहीत्य केले जप्त.

दिनांक २६.०२.२०२१ रोजी वालीव पोलीस ठाणे हद्दीतील मौजे मालजीपाडा गावचे हद्दीतील खाडी किनारी असलेल्या बेटावर अवैध्य गावठी हातभटटी दारु तयार केली जात असल्याचे माहिती मिळाल्याने नमूद ठिकाणी छापा टाकला असता आरोपी इसम पोलीसांची चाहूल लागताच झाडी झुडपाचा व दलदलीचा फायदा घेवुन पळून गेला. सदर ठिकाणी गावठी हातभटी तयार करण्याचे द्रव्ये व सामुग्री असा एकूण ६६,०००/रु किंमतीचा माल मिळून आला आहे. सदर बाबत आरोपी विरुध्द वालीव पो. स्टे येथे गुरन ।।। २२०/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(क),(ड), (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ- ०३ विरार, श्री अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, वालीव पोलीस ठाणे चे वपोनि/विलास चौगुले यांचे मार्गदर्शनाखाली सफौ गजानन दिघोळे,पोना/१२८५ कुंभार,पोना/९९२ शिंदे व पोशि/१८२७ हेंबाडे यांनी केली आहे.